
Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV / V

Ajanta Prakashan

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

# CONTENTS OF MARATHI PART - V


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिक मंदी भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम व उपाय<br>**प्रा. डॉ. अलका अनिल मानकर** | १-५ |
| २ | ना. गो. थुटे यांच्या कवितेतील प्रयोगशीलता<br>**डॉ. रवि केवट**<br>**पुंडलिक ज. शेंडे** | ६-९ |
| ३ | ग्रामीण कथा - शतका अखेरची - एक चिकित्सा<br>**डॉ. निशा शेंडे** | १०-१३ |
| ४ | भारत व भारतातील अन्नसुरक्षिततेचा अर्थवेवस्थेवरील परिणाम<br>**Priyanka Hanmant Gaddapwar** | १४-१७ |
| ५ | जागतिकिकरणाचा आदिवासी समाजावर झालेला परिणाम<br>**प्रा. डॉ. राजेंद्र एम. झाडे** | १८-२१ |
| ६ | प्रादेशिक विविधता आणि आप्त संबंधाचे महत्व<br>**डॉ. मोहम्मदअली एम. ए.** | २२-२४ |
| ७ | खरातांच्या कथेतील समतामूलक तत्वज्ञान<br>**प्रा. डॉ. अनिलकुमार एस. पगारे** | २५-२९ |
| ८ | भर्तृहरि प्रतिपादित नीतिमूल्यांचे औचित्य<br>**पंकजा माधव वाघमारे** | ३०-३४ |


PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5** (www.sjifactor.com)

# ८. भर्तृहरि प्रतिपादित नीतिमूल्यांचे औचित्य

**पंकजा माधव वाघमारे**
संस्कृत विभाग प्रमुख, शासकीय 'ज्ञान विज्ञान' महाविद्यालय, औरंगाबाद.

भारतीय संस्कृती ही नेहमीच जगाच्या अग्रस्थानी राहिलेली आहे. ती जगात सर्वश्रेष्ठ म्हणून मान्यता पावलेली आहे. संपूर्ण जगावर अधिराज्य गाजविणाऱ्या या संस्कृतीला पुष्ट करण्याचे महत्वाचे कार्य संस्कृत भाषा करीत आहे. 'संस्कृतं संस्कृतेर्मूलम् ।' ही उक्ती त्यादृष्टीने सार्थ ठरत आहे.

संस्कृत भाषेतील सर्व ग्रंथांनी नीतिमूल्यांची जोपासना करत भारतीय संस्कृतीला हातभार लावला आहे. त्यातही भर्तृहरीच्या नीतिशतकासारख्या ग्रंथाचे योगदान अद्वितीय आहे.

नीतिशतकात भारतीय जीवनातले दैवतनिष्ठा, कर्मनिष्ठा, शीलमहिमा, ध्येयनिष्ठा हे त्याच्या प्रतिपादनाचे प्रमुख आधार आहेत. जीवन आणि आचरण अथवा नैतिक वर्तन यांविषयी म्हणीवजा चटकदार सुभाषिते भारताता प्राचीन काळापासून फार रुढ आहेत. असे बोधपर काव्य (Gnomic Poetry) भर्तृहरीच्या काळापूर्वीही जरी अस्तित्वात असले, तरी कालदृष्ट्या एक ठळक टप्पा म्हणून भर्तृहरीलाच अशा वाङ्मय प्रकाराचा आद्य ज्ञात प्रणेता मानले पाहिजे.

नीतिशतक हे केवळ शुद्ध नीतिबोधात्मक नसून व्यवहारोपदेशपर (Didactic) काव्य होय. अशा काव्यांत अनेक पिढ्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा ठेवा संकलित केलेला असतो. बोधकाव्यांनी भारतीय जीवनावर मोठा प्रभाव पाडला असून भारताची सांस्कृतिक पातळी त्यायोगे नि:संशय उंच केली आहे. 'नीति' या जीवनांगाची भर्तृहरीने योग्य ती दखल घेऊन त्याबाबताचा आदर्श दृष्टिकोन कोणता ते सांगितले आणि भावी पिढ्यांना जणू नैतिक, सांस्कृतिक जीवनमूल्ये पुरविली.

नीति म्हणजे नेणारी, अर्थात सरणी, मार्ग, वाट, यावरुन वर्तन, आचरणाचा मार्ग, जीवनप्रणाली, असा अर्थ या शब्दाला प्राप्त झाला. 'नीति' म्हणजे सदाचरण, नयशीलता हाही अर्थ अभिप्रेत आहे. 'जीवनातील वागणुकीचा शिष्टसंमत मार्ग', हा या संज्ञेचा अर्थ येथे विवक्षित आहे.

मानवी जीवनाला आधारभूत अशा मूल्यांची खरी ओळख नीतिशतकाच्या द्वारा करुन देणे हे भर्तृहरीचे उद्दिष्ट या संग्रहामुळे चांगल्या प्रकारे साध्य झालेले दिसते.

नीतिशतक हा केवळ सूक्तींचा संग्रह नाही, किंवा केवळ व्यावहारिक सदाचरणाचा कोरडा वस्तुपाठ नाही तर जीवनाविषयीची गूढ आसक्ती व अनिष्ट प्रवृत्तींचा उबग हे त्यांत प्रतिबिंबित झालेले आहेत. राजे लोकांचा तापट स्वभाव, द्रव्याचा उन्माद, सेवाधर्मातील अपमानित जिणे, विकार व दुराग्रह यांशी वैदग्ध व सुसंस्कृती यांचा होणारा संघर्ष, अज्ञ-दुष्टांनी सुज्ञ-सुष्टांची केलेली अवहेलना, या साऱ्यांचा परामर्श घेऊन कवी आपल्या हृदयातले सल सांगतो. थोडक्यात, अन्यायाची



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

चीड, स्वाभिमानाचा स्पर्श, दुसऱ्याच्या दु:खांची जाणीव, भव्यदिव्य ध्येय आणि भर्तृहरीची जीवननिष्ठा या सर्वांचे दर्शन या सुभाषितांतून घडते.

परिवर्तन हा या जगाचा एक अपरिहार्य नियम ! कालमानाप्रमाणे समाजामध्ये, माणसाच्या जीवनामध्ये देखील परिवर्तन होत असते, जगण्याच्या शैलीमध्ये बदल होत असतो. परंतु 'मूल्य' ही मात्र चिरंतन, शाश्वत असतात. काळ कोणताही असो मूल्यांमध्ये मात्र बदल होत नाही. भर्तृहरीने सातव्या शतकात ज्या मूल्यांचे प्रतिपादन केलेले आहे तीच मूल्य बऱ्याच प्रमाणात आजच्या काळातही कशी उपयोगी आहेत? आधुनिक काळात देखील ती मार्गदर्शक आहेत का? त्यांचे औचित्य काय? या प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न म्हणजे हा अभ्यास होय.

जगामध्ये जेवढी माणसे तेवढ्या प्रवृत्ती असतात. मानवी प्रवृत्तींवर भाष्य करतांना भर्तृहरीने त्या प्रवृत्तीनुसार मानवाला उपमा देखील बहाल केलेल्या आहेत. या उपमा आजच्या काळात देखील तंतोतंत लागू पडतात.

एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थान्परित्यज्य ये
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये
तेऽमी मानवराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये
ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे ॥९२॥

(ल. गो. विंझे)

**२. परद्रव्यापहार** - भ्रष्टाचार ही आपल्या देशाला लागलेली कीड आहे, वगैरे चर्चा आपण नेहमीच करत असतो. आज एकही असे क्षेत्र नाही, जिथे लाच घेतली जात नाही. आपण आज लाचलुचपतीविषयी बोलतो. परंतु ७ व्या शतकातील भर्तृहरीसुद्धा त्यावेळच्या स्थितीत 'लाच कोण घेत नाही?' असे आव्हान देऊन विचारतो. धनाचे कर्तृत्व हे अनादि काळापासूनचे आहे. 'द्रव्येण सर्वे वशाः ।' त्यामुळे असा कोण आहे की ज्याच्या तोंडात खायला (भरपूर) मलिदा भरला असतां, तो वश होत नाही?

को न याति वशं लोके मुखे पिण्डेन पूरितः ।
मृदङ्गो मुखलेपेन करोति मधुरध्वनिम् ॥

इंग्लंडचा मुख्य प्रधान वॉलपोल म्हणत असे की, भर्तृहरी म्हणतो 'सर्वे गुणाः कांचनाश्रयन्ते' हे जरी खरे असेल तरी देखील स्वत:चे कल्याण साधायचे असेल तर परद्रव्यापहार करणे हे सर्वथा अयोग्य आहे. 'परधनहरणे संयमः' असे तो म्हणतो. प्रत्येक माणसानो या मूल्याचा अंगीकार केला तरच देशाचे पण कल्याण होईल यात शंका नाही.

**३. दानमाहात्म्य** - भारतीय संस्कृती ही त्यागाची आहे, भोगाची नाही असे आपण म्हणतो. 'आपली भाकरी दुसऱ्यालाला देणं' ही आपली संस्कृती आहे. असे देखील आपण म्हणतो. प्रसंगी आपण अनेक दानशूरांची उदाहरणे देखील देतो. भारतीय उत्सवांच्या केंद्रस्थानी आपण दानालाच ठेवलेले आहे. भर्तृहरीने देखील ३-४ श्लोकांमध्ये दानाचे माहत्म्य वर्णन केलेले आहे.'दानं भोगो नाशस्तिस्रो गतयो भवन्ति वित्तस्य ।' (७६)



Govt. College of Arts & Science * Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

असे तो म्हणतो. संपत्तीचा संचय करणाऱ्यांना किंवा उपभोग घेणाऱ्यांना तो 'गतिरेकैव वित्तस्य दानमन्या विपत्तय: । असे ठणकावून सांगतो.

काळ बदलला तरी दानाचे महत्त्व तसूभर देखील कमी झालेले नाही. आपल्या देशात एखादी नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळेस याची प्रचिती येतेच.

**४. परोपकार**

'जे का रंजले गांजले, त्यांसी म्हणजे जो आपुले
तोचि साधु ओळखावा, देव तेथेची जाणावा ।।'

ही सूक्ती बहुश्रुतच आहे. दुसऱ्यांवर उपकार करणे, विशेषत: स्वत:चा स्वार्थ नसतांना हे एक अत्यंत महत्त्वाचे मानवी मूल्य आहे. भर्तृहरीने तीन श्लोकांमध्ये परोपकाराचे महत्त्व वर्णन केले आहे. 'अनुध्दता: सत्पुरुषा: समृद्धिभि:, स्वभाव एवैष परोपकारिणाम् ।' (५०) किंवा 'सन्त: स्वयं परहितेषु कृताभियोगा: ।' बसं मां सूर्य, चंद्राचे उदाहरण देऊन सांगतो. आज देखील भर्तृहरीने प्रतिपादन केलेल्या या मूल्याचा प्रत्येकाने अंगीकार केला तरच एका कल्याणकारी समाजाची निर्मिती होऊ शकेल.

**५. ज्ञान, विद्येचे महत्त्व** - अनेक युगांमध्ये परिवर्तन झाले. अश्मयुगापासून ते संगणक युगापर्यंत मानवाने जी प्रगती केली ती अनाकलनयीच आहे. या सगळ्या स्थित्यंतरांमध्ये ज्ञानाचे आणि विद्येचे महत्त्व मात्र अबाधित राहिले आहे. दीडशे वर्षे पारतंत्र्यात जखडलेला आपला भारत देश स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अगदी कमी कालावधीतच महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहतोय तो या ज्ञान आणि विद्येचा जो ठेवा आपल्याकडे आहे त्या जोरावरच ! १०-१२ सुभाषितांमध्ये भर्तृहरीने ज्ञानाचे आणि विद्येचे महत्त्व प्रतिपादिले आहे. 'विद्या राजसु पूजिता न तु धनं, विद्याविहीन: पशु: ।' (२१) किंवा 'क्षीयन्ते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम् ।' (२०) असे तो म्हणतो.

दूरदर्शनच्या आहारी जाणाऱ्या तरुण पिढीला आणि केवळ गुणार्थी होऊन विद्याध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्याला भर्तृहरीने प्रतिपादन केलेले विद्येचे महत्त्व नक्कीच प्रेरणादायी आहे.

**६. प्रयत्नवाद (कष्टाचे महत्त्व )** - भर्तृहरीने अज्ञपद्धतीमध्ये तीन श्लोकांमध्ये मूर्ख लोकांच्या वर्तनात परिवर्तन होणे अशक्य आहे असे सांगत असतांनाच प्रयत्नवादाचे देखील वर्णन केले आहे. या श्लोकाचे वामन पंडिताने केलेले भाषांतर वाचल्यावर प्रयत्नसाध्यच सर्व काही आहे याची प्रचित येते.

प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीही वितळे ।
सशाचेही लाभे विपिन फिरता शृंगही करी ।

आणि यांसारख्याच इतरही सुभाषितांतून प्रयत्नवादाचे दर्शन घडते.

**६. धैर्य** - संकटे तर माणसाच्या आयुष्यात येतच असतात परंतु त्याला धैर्याने सामोरे जावे लागते. धैर्याच्या जोरावरच तर भारतीयांनी अनेक संकटांचा सामना केल्याची इतिहासात अनेक उदाहरणे आहेत. भर्तृहरी म्हणतो –

प्राय: कन्दुकपातेनोत्पतत्यार्य: पतन्नपि ।
तथा त्वनार्य: पतति मृतिण्डपतनं यथा ।।

**अर्थ** - (पडणे कोणालही चुकत नाही, पण) धीराचा पुरुष पडतो तो चेंडूसारखा पडूनही पुन्हा उशी घेणारा, भित्रा मात्र पडतो तो मातीच्या ढेकळासारखा-कायमचाच !

**७. मानीपणा, तेजस्विता** – कितीही वाईट वेळ आली तरी माणसाने स्वाभिमान सोडून लाचारी पत्करु नये. भर्तृहरी म्हणतो –

कुसुमस्तबकस्येव द्वे गती स्तो मनीषिताम् ।
मूर्ध्नि वा सर्वलोकस्य विशीर्येत वनेऽथवा ।।

**अर्थ** - थोर मानवी पुरुषांच्या गती, फुलांप्रमाणे दोनच असू शकतात. सर्वांच्या शिरोभागी तरी शोभावे किंवा रानांत (अज्ञातपणे) सुकून तरी जावे.

इंग्रजी कवि ग्रे याचे वचन 'Full many a flower born to blush unseen' (विंझे पान क्र. २५)

भर्तृहरीने प्रतिपादन केलेल्या या जीवनमूल्याचा आज देखील तेवढाच प्रभाव समाजमानसावर आहे.

**८. सदसद्विवेक** - प्रत्येक माणसाने आपली अस्मिता जोपासली पाहिजे. प्रत्येकाच्या ठिकाणी जर कार्याकार्यविवेक असेल तर आजही अर्धे प्रश्न निर्माणच होणार नाहीत, असे मला वाटते. सदसद्विवेकबुद्धि माणसाच्या ठिकाणी असेल तरच तो एक श्रेयस्कर आयुष्य जगू शकतो. या संदर्भात भर्तृहरी म्हणतो –

कर्मायत्तं फलं पुंसां बुद्धि: कर्मानुसारिणी ।
तथाऽपि सुधिया भाव्यं सुविचार्यैव कुर्वता ।। (विंझे,१२४)

९. यांव्यतिरिक्त भर्तृहरीने सुभाषित क्र. ६९, ७०, ७१, ८५, ९८ यांमध्ये एक आचारसंहिताच सांगितलेली आहे. कसे वागावे आणि कसे वागू नये याचे वर्णन करत असताना त्याने अनेक जीवनमूल्यांचा उल्लेख केलो आहे. त्याचप्रमाणे माणसाचे अस्तित्व कसे असावे (क्र. ३२) इथपासून ते सज्जनांच्या सहवासाचे महत्त्व, दुष्टाचे दुर्गुण, परनिंदा करु नये, परस्त्रीकडे पाहू नये, हाती घेतलेले कार्य तडीस न्यावे, आळसाचा त्याग करावा इ. मूल्यांचा बारकाईने विचारपूर्वक उल्लेख केलो आहे.

थोडक्यात काय तर जीवनांत ध्येयसिद्धीला मार्गदर्शक व उपकारक होतील अशी मूल्ये, तत्त्वे, दिशा, मार्ग त्याने नीतिशतकांत सांगितले आहेत. अज्ञनिंदा, सज्जनप्रशंसा करुन साहित्य, विद्वत्त्व, विद्या, तप, दान, शील यांची नितांत आवश्यकता व महत्त्व त्याने प्रतिपादिले आहे. अर्थप्राप्ती हेही जीवनसंग्रामांत एक महत्त्वाचे अंग म्हणून सांगितले आहे. सत्संगती, पराक्रम, अभिमान या निष्ठा त्याने आवर्जून सांगितल्या आहेत, आणि अखेरीस दैव, कर्म यांचा प्रभाव वर्णूनही



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

सत्क्रियेच्या बळावर जीवनांत त्यावर मात करिता येईल, असे सुचविले आहे. यावरुन लौकिक व अध्यात्मिक अशी दुहेरी मूल्ये आपल्या वर्तनाच्या, आचाराच्या ध्रुवदर्शिकाच आहेत.

शेवटी भर्तृहरीच्याच भाषेत सांगायचे झाल्यास, अहिंसा, अस्तेय, सत्यभाषण, यथाशक्ती दान, परस्त्रीविषयी आदर, तृष्णानाश, वडीलधाऱ्यांचा आदर, सर्वभूती, दया, शास्त्रपूत कर्मानुष्ठान हाच खरा कल्याणाचा मार्ग होय.

भर्तृहरीने प्रतिपादन केलेल्या मूल्यांचा आधुनिक काळातही तेवढाच उपयोग आहे, नव्हे त्यांची आजच्या पिढीला निकड आहे. यातच भर्तृहरीच्या विचारांचे यश आहे असे म्हणता येईल.

जॉर्ज वॉशिंग्टनविषयी म्हटले जाई की,

"(He was) First in war, First in Peace, First in the Hearts of his countrymen !''

तद्वतच भर्तृहरीचा आदर्श हा कोणत्याही परिस्थितीत कायमचा प्रथम श्रेणीत असणार !

(शतकत्रयी, ल. गा. विंझे, पृष्ठ २१)

Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad